International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# 'वाडा' कादंबरीतील अंध आदिवासी स्त्री जीवन

**वानोळे जनाबाई दत्ता[1], प्रा. डॉ. बाबासाहेब रावसाहेब शेंडगे[2]**

*[1]संशोधक विद्यार्थी, संगमनेर नगरपालिका कला, दा. ज. मालपाणी वाणिज्य आणि ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर, जि. अहिल्यानगर*

*[2]संशोधन मार्गदर्शक, रयत शिक्षण संस्थेचे रा. ब. नारायणराव बोरावके, कॉलेज श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर*

*Corresponding Author – वानोळे जनाबाई दत्ता*

**DOI - 10.5281/zenodo.20580114**

**प्रस्तावना :**

आदिवासी साहित्याची ओळख हि १९७९ मध्ये भद्रावती जिल्हा चंद्रपूर येथे भरलेल्या पहिल्या आदिवासी साहित्य संमेलनाने झाली. यापूर्वी आदिवासी नसलेल्या लेखकांकडून काही प्रमाणात आदिवासी जीवन रेखाटलेले दिसते. पण त्यामध्ये अनेक अर्थाने अस्सलपणा आणि वास्तविकपणाचा अभाव आढळतो. त्यामुळे खऱ्या अर्थाने आदिवासी साहित्य हे आपल्या स्वतंत्र वेगळेपणाने नव्वदोत्तरीनंतर मराठी साहित्य प्रवाहात सामील झाले. आज कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र अशा प्रकारातून समृध्दपणा आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करीत आहेत. आदिवासींचे उपेक्षित जगणे, प्रस्थापित व्यवस्था, दलाल, सावकार यांच्याकडून होणारी फसवणूक, अन्याय, अत्याचार, संस्कृती, आदिवासींचा वैभवशाली इतिहास, स्त्री-जीवन, निसर्गमय परंपरा, जल, जंगल, जमिन, जागतिकिकरण, औद्योगिकीकरण, शहरीकरण इ. विविधांगी स्वरुपाच्या अनुभवांची मांडणी आदिवासी साहित्यात होत आहे. लेखक माधव सरकुंडे हे प्राध्यापक, निर्भीड कार्यकर्ता, विचारवंत, वक्ता म्हणून समाजात वावरत आहे. त्यांनी 'मनोगत' 'चेहरा हरविलेली माणसे', 'मी तोडले तुरुंगाचे दार' असे काव्यसंग्रह तसेच 'वाडा', 'सल', 'आदिवासी अस्मितेचा शोध', 'धनगर आदिवासी नाहित दाखले आणि पुरावे' अशा साहित्यकृतीचे लेखन केलेले आहे. त्यांच्या साहित्यातून आदिवासींच्या समस्या, निसर्गवेदना, जीवनानुभव इत्यादींची यथार्थपणे मांडणी केलेली आहे. 'वाडा' हि त्यांची पहिली कादंबरी असून मे-१९९६ साली प्रकाशित झालेली आहे. हि कादंबरी १४१ पृष्ठांची असून ती १३ प्रकरणांमध्ये विभागलेली आहे. या कादंबरीचा समावेश अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात झालेला आहे. त्यामध्ये सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे, संत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ इ. विद्यापिठांच्या पदव्युत्तर मराठी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये समावेश झालेला आहे. या कादंबरीचे मुखपृष्ठ व आतील चित्रांच्या पृष्ठातून आंध आदिवासींचे विविधांगी जीवन प्रतिबिंब अधोरेखित केलेले आहे. ही कादंबरी पुसद, उमरखेड, कोर्टा, किनवट, माहूर या गावाच्या परिसरातील डोंगराळ भागामध्ये वास्तव्य करणाऱ्या आंध जमातीच्या वाड्यापाड्यातील आहे. या कादंबरीत आंधवाडीचे चित्रण असलेतरी त्यानुषंगाने अनेक वाड्यापाड्यांच्या परिसराचा निर्देशही होतो. त्यामध्ये

इचलवाडी, सागरवाडी, पाळू, वडद, मरचुंडी, बेलवाडी, पिंपळगांव, डोंगरगांव, निवघा, चेंडकी, भोरवाडी, कोनदरी इ. वाड्यांच्या डोंगरदऱ्यांमध्ये ही कादंबरी पुढे-पुढे सरकत असलेली दिसते. या कादंबरीतून आंध आदिवासींचे विविधांगी मार्गाने ग्यानबा पाटलाकडून होणारे शोषण उजागर होते. प्रस्तुत शोधनिबंधातून प्रा. माधव सरकुंडे यांच्या 'वाडा' या कादंबरीतून प्रकट झालेले आंध आदिवासी स्त्री जीवन उजागर करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**शोध निबंधाचे उद्देश :**

१) 'वाडा' : आदिवासी कादंबरीचे स्वरूप अभ्यासणे.
२) 'वाडा' : आदिवासी कादंबरीतून अभिव्यक्त झालेल्या विषयाची चर्चा करणे.
३) 'वाडा' : आदिवासी कादंबरीत रेखाटलेल्या स्त्रीयांचे जीवन, कणखरपणा, कष्ट, अन्याय, अत्याचार व समाजातील स्थान अधोरेखित करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत 'वाडा' कादंबरीतील आंध आदिवासी स्त्री जीवन. या शिर्षकाच्या शोध निबंधाची मांडणी करतांना वर्णनात्मक आशय विश्लेषण व समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**आदिवासी कादंबरीचे स्वरूप :**

आदिवासी कादंबरीचे स्वरूप पाहता मराठी कादंबरीमध्ये आदिवासी साहित्यातील कादंबरी या साहित्यप्रकाराचे महत्व अनन्यसाधारण आहे. मराठी आदिवासी कादंबरीच्या लेखनाची सुरुवात आदिवासी नसलेल्या लेखकांकडून झालेली आहे. आदिवासी कादंबरीमध्ये, 'आदिवासींच्या' जीवनातील गुंता-गुंत, त्यांच्या मनातील द्वंद्व, समाज व्यवस्थेचा आदिवासींना जाच त्यात होणारा त्यांचा कोंडमारा, वस्तूस्थितीशी आदिवासींची झुंज आणि तडजोड, संघर्षातूनही मार्ग काढण्याची धडपड, आपल्या पारंपारिक रुढी, परंपरांच्या मर्यादांचे पालन करणारा त्यांचा संयमभाव, त्यांची आनंदमयी जीवनशैली आणि दारीद्रयाचा सामना हे सर्व कादंबऱ्यांचे विषय आहेत.
१) अशा अनेक विषयाच्या अंगाने आदिवासी जीवन कादंबरीत चित्रीत झालेले आहे. श्री. व्यंकटेश केतकरांची 'गोंडवणातील प्रियवंदा' (१९२६), त्यानंतर र.वा. दिघे यांची पानकळा, सराई, वि.वा. हडप यांची 'गोदाराणी', अन्नदाता उपाशी दुर्गा भागवत यांची 'महानदीच्या तीरावर', गो.णी. दांडेकर यांची 'जैत रे जैत', 'भिल्लवीर कलिंग', नलीनी सहस्त्रबुध्दे यांची 'राणी दुर्गावती', महाश्वेता देवी यांची 'अरण्येर अधिकार', जगदीश गोडबोले यांची 'पारध' (१९८९) इ. कादंबऱ्यांचे लिखाण १९९० च्या अगोदर प्रामुख्याने झालेले आहे. त्यानंतर विलास मनोहर यांची' एका नक्शलवाद्याचा जन्म' अनंत मनोहर यांची 'अरण्ये कांड' प्रकाश कोळवण यांची 'नक्शलनामा', शंकरराव खरात यांची 'पारधी', बाबा भांड यांची 'तंट्या' अशा अनेक कादंबऱ्यांचे लेखन आदिवासी जीवन संस्कृतीच्या अंगाने झालेले दिसते.

आदिवासी लेखकाने मांडलेले साहित्य हे आगळा-वेगळा जीवनानुभव प्रकट करते. या विषयी आदिवासी लेखक वाहरू सोनवणे म्हणतात, आदिवासी साहित्याचा पोत किंवा ढाचा हा साहजिकच आदिवासी जीवनातील ताणतणाव, त्यांचे सुख दुःख, त्यांचे निसर्गाशी असलेले नाते, अलिकडच्या काळात जंगल व निसर्गाच्या विनाशासोबत आदिवासी संस्कृतिक जीवनावर होणारा वाईट परिणाम यांनी व्यापलेला आहे.
२) यावरून १९९० नंतरच्या आदिवासी साहित्यातील आशयात्मक मांडणीची जाणीव लक्षात येते. याच

जाणीवेतून आदिवासी साहित्यिकांचे कादंबरी लेखन झालेले आहे. आदिवासी कादंबरी अस्सल जाणीवा घेवून अभिव्यक्त होत आहे. आज मराठी साहित्यात आदिवासी कादंबरीने वेगळा ठसा उमटवलेला आहे. आदिवासी लेखकांनी लिहिलेल्या कादंबरी लेखनाची सुरुवात प्रा. माधव सरकुंडे याच्या 'वाडा' (१९९६) या कादंबरीपासून होते. त्यानंतर बाबाराव मडावी यांची 'टाहो' (१९९८), नजुबाई गावित यांची 'तृष्णा' (१९९९), 'भिवा फरारी' (२००८), गोपाळ गवारी यांची 'कोळवाडा' (२००२), बाबुराव नाईक यांची 'शिबली' (२०१२), निवृत्ती धोंगडे व शांताराम गजे यांची 'बागडीची माची' (२०१३), डॉ. दिपक कुमार वळवी यांची 'डुबु... डुबुंग... च्याय... च्याय...' (२०१४), तुकाराम चौधरी यांची 'पाड्यावरचा टिल्या', देवदत्त चौधरी यांची 'पळसचोंड' (२०१६), डॉ. कृष्णा भवारी यांची 'इधोस' (२०२०), सुनिल गायकवाड यांची 'मासोली' (२०२१) इ. आदिवासी कादंबऱ्यांमध्ये आदिवासींचे वास्तव जीवन यर्थार्थपणे मांडलेले आहे. आदिवासी जीवनाचे अनेक अस्सल अनुभव अधोरेखित झालेले आहेत. त्यांच्या व्यथा-वेदना, दुःख, कष्ट इ. व्यक्त करत-करत अन्याय-अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम होत असल्याचे दिसते. सण-उत्सव, नृत्य, स्त्री-पुरुष जीवन, व्यसनाधीनता असे अनेक विविधांगी विषय कादंबरीतून मांडले जात आहेत.

**'वाडा' आदिवासी कादंबरीतील स्त्री-जीवन :**

आदिवासी संस्कृतीला प्राचीन समाज जीवनाचा वारसा आहे. निसर्ग, जल, जंगल, जमिन इ. अनेक प्राकृतिक घटनांना अनन्यसाधारण महत्व आदिवासींच्या जीवनात आहे. त्यांची प्राचीन संस्कृती, मातृसत्ताक कुटूंब व्यवस्था आजही अस्तित्वात असलेली दिसते. स्त्रीचा मानसन्मान व निर्णय प्रक्रियेतील तिचे स्थान अबाधित राहिलेले आहे. हि संस्कृती एका बाजूला टिकुन आपले वेगळेपण स्पष्ट करणारी आहे. तर दुसऱ्या बाजूला ती तिला अनेक अन्याय, अत्याचारांना, कुचेष्टांना बळी पडावे लागत आहे. स्त्री जीवनाचे अनेक संदर्भ बदलत आहेत. त्यांचे प्रतिबिंब आदिवासी साहित्याच्या सर्वच प्रवाहाबरोबर कादंबरीमध्ये पडत आहे.

प्रा. माधव सरकुंडे यांची 'वाडा' हि कादंबरी आंध जमातीच्या पर्यायाने आदिवासींच्या समग्र दुःखद जाणीवांचे आगार मांडते. आंध आदिवासी जमातीतील स्त्री अत्यंत कष्टाळू असल्याचे चित्रण आलेले आहे. ती आपल्या नवऱ्यासोबत शेतीचे, मजूरीचे, उसतोडीचे, विट भट्टीवर कष्टाची कामे तसेच मुलांचे संगोपन करते. आपल्या कमकुवत आर्थिक परिस्थितीची जाणीव असल्याने कराव्या लागणाऱ्या काबाड कष्टामध्ये ती मागे अजिबात असत नाही. याविषयीचे चित्रण लेखकाने दत्ता या व्यक्तीरेखांच्या बायकोच्या रुपाने वाचकांसमोर उभे राहते. ती कामाच्या ठिकाणीच बाळंतीण होते. पुढे कुटूंबाची आबाळ पाहून नवऱ्याच्या लगेच मदतीला येते. 'त्याच्यानं काय लय खंट्या व्हयाच्यानायी. खंट्या लय झाल्या नाय तं लय हप्ता येईनं. त्याची दशा व्हत होती त्याच्या बायकोला लेकराबाळाची न नवऱ्याची दशा फावनं. म्हून तिनं कंबर कसली. टोपल उचल्लं. बाळातीन व्हवून ते सातव्या दिसी कामाला लागली' कोवळी बाळंतीनं शरीराला आराम इ. गोष्टी आंध स्त्रियांच्या आजही वाट्याला आलेल्या नाहीत. ती आयुष्यभर कुटूंबासाठी राणोमाळ कष्ट करून नवऱ्याला मदत करीत असते. याच कादंबरीमध्ये राघबाची बायको राधीवर आंधवाडीतील पाटील अत्याचार करतो. राधी मानसिक दृष्ट्या पूर्णतः विस्कटलेली असतांना नवऱ्यासाठी परत जीवनात उभी राहू पाहते. सरीचे आईवडील मरण पावतात सरी व तिचा भाऊ दोघेच जगतात. सरी मामा मामीकडे येवून राहते. मामा मामीकडून झालेली मारहाण

पोटमारा, अन्याय, अत्याचार मामाच्याच मुलाशी लग्न तरीही तिला खुप कष्ट जाच याला कंटाळून ती घर सोडून आंधवाडीला निघून जाते. तेथेच १२ वर्ष वास्तव्य करते नवऱ्याची वाट पाहते. नवरा येत नाही आंधवाडीतील लोक तिचे एका व्यक्तीशी मव्हुतर लावून देतात. ती खुप कष्ट करून पोट भरते. तिला दोन मुले होतात ती मुलांना कष्ट करून जगवते. ती मुलांना संदेश देते की, संकटांना तोंड द्यावे, संकटांना घाबरू नये. कष्ट करावे यश मिळेल.

'वाडा' या आदिवासी कादंबरीतुन आदिवासी स्त्रीचे चित्रण, त्यांची संस्कृती, रुढी, परंपरा, प्रथा, समस्या व वर्तमान बदलत्या काळाचा प्रभाव या भूमिकेतून आलेले आहे. रात्रंदिवस आदिवासी स्त्री अत्यंत खडतर जीवन जगत आहे. सामाजिक जाचाबरोबरच स्त्रीयांना त्यांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आलेल्या आहेत. भुताळ्या, टाकीन, हडळ अशी अवहेलनाही आदिवासी स्त्रीच्या वाट्याला आलेली आहे. प्रस्थापित ठेकेदार, सावकर, मालक, शिक्षित, नोकरदार, भोंदू यांच्याकडून लैंगिक अन्याय, अत्याचार झालेले चित्रण आदिवासी कादंबरीतून अधोरेखित झालेले आहे. एकंदरित आदिवासी कादंबरीतून भोळ्या, भाबड्या, अशिक्षित, सोशिक, कष्टाळू, प्रामाणिक, विविधांगी स्वरूपाचे त्रास, अन्याय पचवून समर्थपणे उभे राहू पाहणाऱ्या स्त्रियांचे चित्रण यर्थापणे आलेले आहे.

**निष्कर्ष :**

१) 'वाडा' आदिवासी कादंबरीमध्ये आदिवासींचे जीवन, संस्कृती, प्रथा, परंपरा, समस्या, अन्याय, अत्याचार यांचे वास्तव चित्रण केलेले आहे.

२) आदिवासी कुटुंबव्यवस्था प्राचीन काळापासून मातृसत्ताक असली तरी विविधांगी स्वरूपाची स्त्रीयांची होणारी परवड आदिवासी कादंबरी चित्रित करते.

३) आदिवासी स्त्री ही स्वाभिमानी, कष्टाळू व प्रामाणिक असल्याने पुरुषांच्या बरोबरीने कोणतेही कष्ट करण्यास तयार असते. हि आदिवासी स्त्रीची भुमिका आदिवासी कादंबरी अधोरेखित करते.

४) 'वाडा', आदिवासी कादंबरीमध्ये आदिवासींच्या गरीबीचा निरक्षरतेचा फायदा घेवून प्रस्थापित जमिनदार , सावकार यांच्याकडून होणारी पिळवणूक तसेच आदिवसी स्त्रियांवर होणारे लैंगिक अत्याचार मुखर होतात.

**संदर्भ :**

१) तुकाराम विनायक, आदिवासी साहित्य दिशा व दर्शन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १५ नोव्हेंबर २०१२, पृष्ठ क्र. ७१.

२) माधव सरकुंडे, 'वाडा', देवयानी प्रकाशन, यवतमाळ, प्रथम आवृत्ती, मे-१९९६, पृष्ठ क्र. ६३,

३) तत्रैव पृ. क्र. ६४,

४) तत्रैव पृ. क्र. ६५,

५) तत्रैव पृ. क्र. १०५

६) सोनवणे वाहरू, आदिवासी साहित्य संस्कृती आणि चळवळ, मेधा पब्लिसिंग हाऊस, अमरावती, प्रथम आवृत्ती, ९ ऑगस्ट २०२० पृ.क्र. २५८